# प्रकरण दुसरे

# 'चंदन' कादंबरीतील स्त्री-चित्रण

# प्रकरण दुसरे

# 'चंदन' या कादंबरीतील स्त्री चित्रण

## ०१. प्रस्तावना :

अण्णा भाऊ साठे यांच्या नावावर जवळपास चाळीस कादंबऱ्यांची यादी आहे. त्यातील काही जीवनातील तडजोड म्हणूनही लिहिल्या गेल्या आहेत. परंतु, स्त्री समस्यांवर आकारलेल्या त्यांच्या कादंबऱ्या विशेष अभ्यसनीय ठरणाऱ्या आहेत. या स्त्री समस्यीय कादंबऱ्यांमधून वेश्या, मुरळी, कामगार, नाची इ. रुपात स्त्रियांचे वेगळे जग मांडून त्यातील दाहकता, भयानकता मराठी साहित्यात प्रथमच आणली. ही दाहकता त्यांच्या 'चित्रा', 'वैजयंता', 'चंदन', 'चिखलातील कमळ', 'आवडी' इ. कादंबऱ्यातून प्रत्ययास येते.

या दृष्टिकोनातून अभ्यास करताना या प्रकरणात 'चंदन' या कादंबरीच्या आधारे अण्णाभाऊंनी कोणती स्त्री समस्या व ती कशाप्रकारे मांडली आहे ? या दृष्टिने झोपडपट्टीच्या पार्श्वभूमीवर एक उपेक्षित, दीन स्त्री चित्रण समर्थपणे उभे करतात ते कशा प्रकारे ? हे या प्रस्तुत प्रकरणात, व्यक्तिरेखा व त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये, कामगार प्रश्न, विधवाजीवन या मुद्द्यांच्या आधारे विश्लेषण हा या प्रकरणाचा हेतू ठरणार आहे.

## ०२. 'चंदन' कादंबरीचे आशयसूत्र :

'चंदन' ही विधवा स्त्री कामगारांच्या प्रश्नांकडे आकृष्ट करणारी एक वेगळी कादंबरी आहे. ही संपूर्ण कादंबरी म्हणजे लढाऊ दुर्दैवी विधवेची संघर्षकथाच वाटते. हा संघर्ष केवळ 'चंदन'चाच न राहता तो संपूर्ण विधवा कामगार स्त्रियांचाच वाटतो. म्हणूनच कामगार स्त्रीचे जीवनदर्शन घडविणारी ही अण्णाभाऊंची सर्वोत्तम कादंबरी आपले नुसतेच लक्ष वेधून न घेता वाचक वर्गाला अस्वस्थही करते. 'चंदन' कादंबरीची नायिका चंदन विधवा झाल्यानंतरच तिचा कामगारविश्वाशी संबंध येतो. तोपर्यंत या विश्वातील समस्यांपासून ती दूर असते, तरीही ती जेव्हा या जगाचा सामना करते तेव्हा ती लढाऊ कामगार स्त्री बनते. मुंबईत वासनेने बरबटलेल्या लोकांशी ती धीराने सामना करते. प्रसंगी जेलही भोगते. या कादंबरीत अण्णाभाऊंनी तिच्या वाट्याला येणारे दारुण दु:खच चित्रित केलेले आहे. म्हणूनच, अण्णाभाऊंच्या साहित्याचे अभ्यासक, संशोधक त्यांच्या या कादंबरीबद्दल मत व्यक्त करताना म्हणतात की, ''अण्णाभाऊंची 'चंदन' ही कांदबरी म्हणजे झोपडपट्टीतील क्रूर वासनेने अग्निपरीक्षा घेतलेल्या एका सुंदर, तरुण पण दुर्दैवी विधवेची व्यथात्मिका आहे.''[१]

'चंदन' ची नायिका 'चंदन'चा जन्म सातारा जिल्ह्यातील एका शेतमजुराच्या पोटी होतो. 'चंदन'चे दुर्दैव तिच्या जन्माआधीपासूनच तिची पाठराखण करीत असते. म्हणूनच तिच्या जन्माआधीच तिच्या जन्मदात्याला ती पोरकी होते. त्यानंतर लगेच दोन वर्षाची होते न होते तोवर आईच्या मायेलाही पारखी होते. अशा आई-वडिलांच्या मायेला दुरावलेल्या 'चंदन' चा आधार अखेर मामा बनतो. त्यांच्या मुलांमध्ये खेळत-बागडतच मोठी होत असते. रुपाने, गुणाने आणि सौंदर्याने बहरत असलेली चंदन लोकांच्या नजरेत येताच मामा तिचं लग्न मानगावच्या तिच्यासारख्याच पोरक्या पण, कष्टाळू जगूशी लावून देतो. जगू आणि चंदनचा सुखी संसार सुरु होते. पुढे तिला एक मुलगा होतो. घरचा खर्च वाढतो पण, गावात काही मनाजोगतं काम मिळत नसल्याची खंत जगू व्यक्त करतो.तेव्हाच मुंबईत कष्टकरी माणसाला खूप काम आहे, भरपूर पैसा कमविता येईल ही कुणीतरी कानावर टाकलेली दंतकथा ऐकून जगू-चंदन-राजा अशी तीन तोंडे पोटासाठी मुंबईला येतात; आणि मुंबईच्या बकाल जीवनात त्यांचा समावेश होतो. पण मुंबईतही काम नाही, घर नाही, अन्न नाही. अशा अवस्थेत भटकत भटकत शेवटी ते घाटकोपरला येतात. तेथे डोंगर फोडण्याच्या कामावर जगूला दोन रुपये रोजाने मजुरीचे काम मिळते. त्याबरोबरीने रात्री तो बत्तीवाल्याचेही काम करु लागतो. दिवस रात्र कष्ट उपसणे सुरु झाले आणि हळूहळू जगू-चंदनचा संसार बहरला, त्यांना बरे दिवस आले. राजाही मोठा होत होता. या अपरिचित मुंबईत चंदनच्या शेजारी राहणारा पांडुबाबा याने चंदनला आपली मुलगी मानले. राजा आणि माया यांच्या एकत्र खेळण्या बागडण्यामुळे आपल्यालाही गोड मुलगी असावी अशी स्वप्ने चंदन पाहू लागली. तेवढ्यात तिच्यावर एक मोठे संकट कोसळले. आई-वडिल नसलेली चंदन ज्या जगूबरोबर सुखी संसाराची स्वप्ने पाहत होती तो तिचा पतीही तिला एकटीला लढण्यासाठी मागे ठेवून जातो. खाणीत स्फोट होतो. या स्फोटात जगू मृत्यू पावतो पण कंत्राटदाराने नुकसानभरपाई द्यावी लागेल म्हणून बेपत्ता झाल्याचे सांगितलेले असते. अशाप्रकारे, सुंदर, तरुण चंदन मुंबईच्या बजबजपुरीत अखेर निराधार बनते. व्यथसागरात बुडून जाते. तिच्या संसाराला ओहोटी लागलेली असते. जगण्याचा मोठा प्रश्न तिच्यासमोर उभा असतो आणि हाच प्रश्न सुंदर, निराधार चंदनला रस्त्यावर मजुरी करायला भाग पाडतो. दयाराम आणि कंपनीत माती कामावर ट्रक भरण्याच्या कामासाठी चंदन जाऊ लागते; आणि तिचे नवे दुर्दैवी जीवन सुरु होते. कामाच्या ठिकाणच्या पुरुषांची नजर तिच्यावरच खिळते. कामाच्या पहिल्या दिवशीच गोपाळ, रंग्या, दयाराम, झिंगऱ्या, टायगर या बुभुक्षित पुरुषांची तिच्या देहावर धाड पडते. प्रत्येकजण वेगवेगळ्या मार्गांनी तिला हस्तगत करण्याचा प्रयत्न करत राहतात. गोपाळ तर तिच्यासाठी दारु पिऊन दंगामस्ती, मारामारी सुरु करतो. रंग्या आणि टायगर यांनी सापळा रचून तिला ट्रकमधून

पळविण्याचा प्रयत्न केलेला असतो. पण, पोलिसांच्या कृपेने सुदैवाने चंदन वाचते. पुन्हा सरळ झोपडीत घुसून गोपाळ तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हाही राजाच्या जागे होण्याने ती वाचते. पण तेव्हा 'दयाराम कंपनी'तील गण्या वडाऱ्याच्या खुनाच्या आरोपाखाली गोपाळ पकडला जातो. त्यानंतर दयारामही आपल्या कारखान्यात कोंडून चंदनवर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो यावेळी चंदन स्वत:च धाडसाने ॲसिडचा डबा दयारामच्या अंगावर फेकते. पण येथेही पारु आणि तिच्या म्हातारीच्या खोट्या जबानीमुळे दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा चंदनला होते. पुढे ही सगळीच विकृत मनाची माणसे झिंगऱ्या, टायगर, गोपाळ, दयाराम तुरुंगात एकत्र येतात. तुरुंगात सुद्धा चंदन सुरक्षित रहात नाही. तेथेही गोपाळ तिला मारण्याचा प्रयत्न करतो. पण अखेर दयाराम आणि गोपाळ यांच्या हाणामारीत दोघेही मरतात. डॉ. जयवंत भोसले चंदनला सोडविण्याचा प्रयत्न करतो. शेवटी ती निर्दोष सुटते. तिचे शत्रू मृत्यू पावलेले असतात. तरीही तुरुंगातून बाहेर पडताना डबडबलेल्या डोळ्यांना पुढील जीवनाची वाटचाल सरळ दिसत नसते. दु:खाच्या वणव्यातून ती बाहेर पडल्यामुळेच तिला सुखाचे मोल कळले होते. भविष्यातील मार्ग अंधुक होता. आधार नसलेली चंदन तिचं सौंदर्य आणि तिचं तारुण्य हेच शत्रू बनू पाहत होते. अशाच शत्रूंबरोबर लढण्यासाठी ती पुन्हा तुरुंगातून बाहेर पडत होती. एक तलवार मोडून पडली तरी दुसरी उगारली जाणार नाही कशावरुन ? असा प्रश्न तिच्या मनात घोंघावत होता.

## ०.३ 'चंदन' मधील व्यक्तिरेखा :

अण्णाभाऊंच्या बहुतेक सर्वच कादंबऱ्या व्यक्तिचित्रप्रधान आहेत. त्यातही त्यांच्या नायिकाप्रधान कादंबऱ्या ज्या आहेत त्यातून व्यक्तिचित्रांचे प्रधानत्व अधिकच जाणवते. त्यांच्या कादंबऱ्यातून येणारी विविध व्यक्तिचित्रे त्या कादंबरीचा अविभाज्य भागच ठरतात. या व्यक्तिरेखांच्या माध्यमातूनच अण्णाभाऊ आपल्या कादंबरीला प्रभावीपणे पूर्णत्वाला नेतात.

अण्णाभाऊंची 'चंदन' ही कादंबरीही व्यक्तिचित्रणप्रधानच वाटते. चंदनची जीवनलढाईच त्यातून उधृत झाली आहे. तिच्याबरोबर जी इतर व्यक्तिचित्रे या कादंबरीत येतात. ती ही पूर्णपणे आगळीवेगळी आहेत. त्यांच्या माध्यमातून अण्णाभाऊ ही वास्तव कथा साकार करतात. या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून अण्णाभाऊ माणसाच्या वृत्ती-प्रवृत्ती, त्यांचे आचार-विचार, अन्यायाविरुद्ध बंडाचे दर्शन, दीनदुबळ्या निराधार म्हणून कोणत्या तरी पुरुषामध्ये आधार शोधणारी काही स्त्री पात्रे त्याबरोबरच या व्यक्तिरेखांतून विकारी मनाचेही दर्शन अण्णाभाऊ घडवून जातात. 'चंदन' या कादंबरीत दयाराम, गोपाळ, टायगर ही सर्व चंदनसाठी वेडी झालेली आणि ती आपली

कशी होईल यासाठीच जीवनाच्या शेवटपर्यंत ती लढत राहतात. या कादंबरीतील विविध घटनाप्रसंगातून त्यांचे विविध स्वभावगुण, त्यांचे विकारी मन यांचे दर्शन घडते.

**०३.१ चंदन :-**

'चंदन' ही या कादंबरीची प्रमुख व्यक्तिरेखा कादंबरीची नायिका म्हणूनच आपल्या समोर अण्णाभाऊ उभी करतात. एक लढाऊ स्त्री, लहानपणीच आईवडिलांचे छत्र हरविलेली, मामांच्या मुलांमध्ये शिकली, वाढलेली, सुंदर, तरुण, लाघवी चंदन दिवसादिवसानं बहरतं होती. सर्वच लोकांच्या नजरा तिच्यावर खिळत होत्या. पुढे मानगावच्या जगूबरोबर स्वत:चा आनंदाने संसार थाटणारी चंदन आपल्याला पहायला मिळते. एक तरुण मुलगी, पत्नी, आई अशा सर्व भूमिकांमधून स्त्रीत्वाची वैशिष्ट्ये दाखवून देते. जगू-चंदन यांच्या संसारवेलीवर 'राजा' नावाचे फूल उमलते. एकाची दोन, नि दोहोंचि तीन तोंड झाली. कष्ट चालू होतेच पण, पोटापुरता पैसा भेटत नव्हता. त्यामुळेच कुणाच्या सांगण्यावरुन मुंबईची वाट धरली आणि चंदनचा कामाच्या शोधार्थ पोटाच्या मागे मुंबईच्या बकाल जीवनात प्रवेश झाला. फिरत-फिरत घाटकोपरला डोंगर फोडण्याच्या कामावर जगूला काम मिळालं. तेव्हा घाटकोपरमध्येच 'पांडूबाबा' या नितीमान म्हाताऱ्याशी ओळख होऊन तिथेच राहण्याची सोय होते. घरात सुख नांदू लागलं. चंदनला नळ माहित नव्हता, दागदागिने, भांडीकुंडी याने घर भरले ते अपार सुख पाहून चंदनला वाटू लागले की,"आपण फार फार दु:ख भोगलं, म्हणूनच देवानं हे सुख आपल्या वाट्याला दिलं आहे."[२](पृ. ३३)

काहीवेळा ती उलटही विचार करुन आपल्यावर भयंकर दु:ख कोसळणार आहे म्हणूनच देवानं हे सुख दिल्याचाही विचार तिच्या मनाला शिवून जाई. त्याप्रमाणेच तिच्यावर दु:खाचा डोंगर कोसळतो. दरी कोसळून जगूचा त्यात मृत्यू होतो. चंदन एकटी पडते. सहा महिन्यापर्यंत संसारालाही ओहोटी लागलेली असते आणि शेवटी अश्रूंना मागे सारुन चंदन 'राजा'साठी, स्वत:च्या मुलासाठी जगण्याचा निर्धार करते आणि दयाराम आणि कंपनीत माती कामावर रुजू होते. इथूनच तिचे कामगार म्हणून वेगळे स्त्रीजीवन सुरु होते. ती जिथे जाईल तेथे पुरुषांच्या बुभुक्षित वासनांनी भरलेल्या नजरांची शिकार बनते. तिचे सौंदर्य आणि तारुण्य हेच तिचे शत्रू बनू पाहतात. कामाच्या पहिल्या दिवसापासूनच कंपनीचा मालक दयाराम तिच्यावर नजर ठेवून असतो. कोणत्याही परिस्थितीत ति मला मिळाली पाहिजे असे स्वप्न पाहतो. सर्वांच्याच विखारी नजरांच्या तरवारींचे वार चुकवीत ती काम करुन घरी येऊ लागते.

लोकांची पाहण्याची रीत, कुत्सित बोलणे, डोळ्यांच्या त्या दुष्ट घाणेरड्या खुणा, ती भयंकर धावपळ या सर्वांची तिला उबग आली. गोपाळने तिच्यासाठी दारु पिऊन गोंधळ घालणे. या सर्वांची तिला भिती वाटत होती. एक दिवस सापळा रचून रंग्या आणि टायगर तिला पळविण्याचा प्रयत्न करतात. तेव्हाही जीवाच्या आकांताने देवाचा धावा करते. ती त्यांना 'मला सोडा माझं मूल माझी वाट पाहत असेल' अशी विनवणीही करते. आपण एका भयंकर संकटाकडे निघालेलो असल्याची जाणीव तिला होते. ''आपण स्वत:च फार-फार रक्षण केलं, पण अखेर फसगत झाली, वैऱ्यांनी दावा साधला. आपला देह हे दोघे ओरबाडणार. उपाशी लांडग्याप्रमाणे आपले लचके तोडणार. माझ्या आतापर्यंत जपलेल्या अब्रुवर दरोडा घालूनच हे दुष्ट शांत होणार. चंदन लुटली जाणार'' असे विचार तिच्या मनात येतात. शील रक्षणासाठीची धडपड ती करु लागते. गोपाळही अचानक झोपडीत येऊन तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. पुढे दयारामही आपल्या कंपनीत कोंडून 'चंदन' ला बळकावण्याचा प्रयत्न करतो. पण तेव्हाच स्वसंरक्षणार्थ दयारामवर ॲसिडचा डबा ओतते आणि तिला तुरुंगात जावे लागते. तुरुंगात गेल्यानंतरही ती सुरक्षित नसते. तेथेही गोपाळ तिच्यावर लक्ष ठेवून असतो. एकदा तिला मारण्याचाही प्रयत्न करतो. पुढे डॉक्टरच्या मदतीने 'चंदन'ची सुटका होते. पण, तिच्या मनात धास्ती आणि डोळे अश्रूंनी डबडबलेले असतात. पुढे आपल्या शीलावर घाला पडणारच नाही अशी शाश्वती नव्हती. त्या डबडबलेल्या डोळ्यांना पुढची वाट अंधुकच दिसत होती.

अशी ही 'चंदन' पावलापावलांवर आपल्या देहावर दरोडा घालणाऱ्याविरुद्ध झगडणारी लढाऊ कामगार स्त्री अण्णाभाऊ रेखाटतात. 'चंदन' च्या माध्यमातून अण्णाभाऊंनी स्त्रीच्या शीलाचे पावित्र्य, त्यावर खिळणाऱ्या बुभुक्षित नजरा, पडणारे डाके, शीलाच्या रक्षणासाठी स्त्रीची चालणारी दुबळी धडपड, या सर्वांमधून एकूणच स्त्रीजीवनविषयक अनेक प्रश्न उभे केले आहेत. स्त्री ही एकटी असेल तर ती असुरक्षित असतेच. पण ती जर विधवा असेल आणि त्यातही कामगार असेल तर, तिचा जीवन जगण्यासाठीचा, स्वत:चे पावित्र्य आबाधित राखण्यासाठीचा जो संघर्ष असतो तो अधिकच भयंकर असतो आणि अस्वस्थ करणारा असतो. हीच अस्वस्थता अण्णाभाऊंची 'चंदन' ही कादंबरी वाचकांच्या मनात निर्माण करते. तेच या कादंबरीचे महत्त्वाचे सूत्र ठरते. ज्या कामगार जगताचा स्वत: अण्णाभाऊंनी अनुभव घेतला होता. त्याच कामगार जगात अण्णाभाऊंनी पाहिलेली लढाऊ स्त्री अगदी जशीच्या तशी चित्रित केली आहे. त्यामुळेच यांत कुठेही भडकपणा न येता जीवनाची वास्तवताच शब्दांशब्दांतून प्रकट होते आणि चंदन विधवा असली तरी अंत:प्रेरणा व

नैतिक मूल्यांवर तिची असलेली अपार निष्ठाही दिसते. शीलरक्षणासाठी झगडताना या निष्ठेच्या पाठबळावर ती विजयी होते.

**०३.२ दयाराम :**

पतीच्या निधनानंतर 'चंदन' चे सहा महिने व्यथेत जातात. पण स्वत:ला आणि राजाला जगविण्यासाठी घरातून बाहेर पडणे गरजेचे होते. पण, एक विधवा, तरुण, निराधार स्त्रीकडे समाज मात्र चांगल्या नजरेने पाहत नसतो आणि जर ती मुंबईतल्या झोपडपट्टीत रहात असेल तर, तिच्या जीवाला आणि शीलालासुद्धा पावलापावलांवर धोका असतो. हेच चंदनच्या बाबतीत झाले. जगूच्या निधनानंतर ती 'दयाराम आणि कंपनी' येथे मातीकामावर रुजू होते. कामाच्या पहिल्या दिवसापासूनच कंपनीचा मालक दयाराम ह्याचा तिच्यावर डोळा असतो. त्याला चंदनचे वेड लागलेले असते. तो रोज तिला तिची खुशाली विचारत असतो. पगाराच्याही दिवशीही तो चंदनला बघून धुंद होतो व तिला म्हणतो, ''सुंदर बागेला तसाच राखणदार हवा. नाहीतर ही बाग उजाड होईल. आलं लक्षात ?'' (पृ. क्र. १९)

अशा प्रत्येक शब्दांतून दयारामचे विकारी मन, स्त्रैण प्रवृत्ती दिसून येते. पगार हातात देतानाही तो तिचा हात दाबतो व आपला हेतू सिद्‌ध करतो. टायगरही दयारामचे वर्णन करताना 'तो एक साप आहे' असे करतो. पुढे त्याच कंपनीत काम करणाऱ्या रंग्या व टायगर यांनी तिला पळवून नेण्याच्या केलेल्या प्रयत्नामुळे तिने दयारामच्या कंपनीचे काम सोडले होते. यामुळे दयाराम मनात कढत होता. पगाराच्या दिवशी हाती आलेली ती चंदन आबाद परत गेल्याने तो चरफडत होता. चंदनला तो एक क्षुल्लक बाई समजत होता आणि ती ही हाती न आल्याने त्याला चीड आली होती. त्याने त्यामुळे रंग्या आणि टायगर यांना कामावरुन काढले होते. तरीही दयारामचे चंदनवेड वाढतच होते. दयारामने टायगरने उठवलेल्या बातमीमुळे डॅक्टरसारख्या गुणी माणसालाही चंदनसाठीच गारद करण्याचा इरादा केला होता. पुढे ही पारु आणि तिच्या म्हातारीच्या मदतीने दयाराम चंदनला आपल्या कंपनीत कोंडून तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हाही चंदनच्या प्रसंगावधानाने (अॅसीड) फेकण्याने ती वाचली होती. पण त्यामुळेही चंदनला तुरुंगवास भोगावा लागला. त्या सरकारी भिंतीतही ती सुरक्षित नव्हती. तिथेही दयाराम व गोपाळ यांच्यात तिच्यामुळेच भांडण होते व त्यात त्या दोघांचा मृत्यू होतो.

अशाप्रकारे, चंदनच्या वेडाने शेवटी दयारामचा अंत होतो. अशा स्त्रीवेडाने एका पुरुषाचा अंत होतो. शेवटी त्याची वृत्तीच त्याचा घात करते. म्हणूनच चंपा ही या पुरुषजातीचे वर्णन करताना

चंदनला म्हणते, ''पुरुषाची मेली जातच भारी गलथान.'' (पृ. क्र.९) या तिच्या बोलण्यावरुनही या कादंबरीतील पुरुषांच्या स्वभावावर प्रकाश पडतो.

**०३.३ इतर पुरुष व्यक्तिरेखा :**

दयारामच्या कंपनीत काम करणाऱ्या गोपाळ, टायगर आणि इतर पुरुष कामगारांनाही चंदनचं चांगलच वेड लागलं होतं. तिला पाहताच सर्वांच्या नजरा तिच्यावर खिळायच्या. गोपाळ तर तिच्या वेडाने दारु पिऊन दंगाच नुसता घालत नव्हता तर तो खून करायलाही मागे पुढे पहायचा नाही.

'गोपाळदादा' या नावाने प्रसिद्ध असलेला सहा फूट उंचीचा अंगानं पैलवान असलेल्या आडदांड गोपाळचं नाव काढलं तरी सर्वचजण घाबरत. त्यामुळेच त्याच्या नादाला कोणी लागत नसे. तो कधी काय करील याचा विश्वास नसल्यानेच दयारामनेही त्याच्या स्वसंरक्षणार्थ गण्या नि गोंद्या हे दोन तगडे शरीररक्षक म्हणून नोकरीस ठेवले होते. गोपाळसारखा मजबूतगडी आला की लोकांना धडकी भरत होती. नारायणनगर नि झोपडपट्टी तो दारु पिऊन बाहेर पडला की थरारत होती. त्यांच्यामते गोपाळला छेडणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण देण्यासारखे होते. पण, गोपाळची नजर मात्र चंदनकडे होती. परंतु त्यानं ते कुणाला कळू दिले नव्हते. ती कशी हाताला लागलं याचाच तो बरेच दिवस विचार करतो आणि एक दिवस तिच्या झोपडीतच शिरतो, तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न करतो, तो चंदनला म्हणतो, ''आज ना उद्या कुणाच्या तरी सावलीत बसावं लागणार आहे. तेव्हा तू माझी हो नि निर्भय जग.'' (पृ. क्र. ६३).

या गोपाळच्या आवेशाने चंदन फारच घाबरते. पण, गोपाळला बळी पडत नाही. राजाला उठवून बसवते. त्यामुळे गोपाळला निघून जावे लागते. हाच गोपाळ शेवटपर्यंत तुरुंगात गेल्यावरही चंदनच्या डोक्यात दगड घालून तिला कायमची संपवावी असा निश्चय करुन आपल्या बराकीत भांडण करुन बाहेर सुटतो व चंदनच्या बराकीकडं वळतो. तेथेही ती वाचते. असा हा गोपाळ चंदनसाठी पिसाळलेला स्वत:च्या जीवनाचा शेवट हाही स्वत:च मारामारीत करुन घेतो.

'टायगर' ही व्यक्तिरेखाही अशीच दुबळी. रंग्याच्या मदतीने चंदनला सापळा रचून पळवून नेऊन आपला कुहेतू साध्य करण्याचा प्रयत्न करतो. रंग्याला इंग्लिस दारुचं आमिष दाखवून त्यालाही सामील करुन घेतो. पुढे पोलिसांच्या मदतीने चंदन वाचते. नंतरही टायगर चंदन त्याची न झाल्याने तिच्या आणि डॉक्टरांविषयी खोट्या कागाळ्या करत सुटतो. पुढे मात्र त्याच्या चुकीचा पश्चाताप त्याला होतो आणि तो दयारामचा बदला घेण्यासाठी त्याच्या गाड्या पेटवून देतो आणि पोलिसांच्या जबानीत म्हणतो, ''मी आज एक मोठ्ठं पाप जाळून खतम केलं आहे.'' (पृ. क्र. ९६).

लष्करात असताना याच दयाराम शेटनं त्याला फसविलेले असते. त्याचा तो बदला घेतो आणि शेवटी तो ही तुरुंगात जातो. दयाराम, गोपाळ, टायगर सगळीच शेवटी तुरुंगात येतात. गोपाळ आणि दयाराम यांनी एकमेकांनाच ठार केलं होतं. टायगर मात्र तुरुंगातून सुटला होता. पण, त्याच्यासमोर पोटाचा प्रश्न उभा होता. म्हणून तो सुटताना चंदनला म्हणतो, ''मला वाटलं होतं, दोन वर्ष मी इथं आराम करीन. पण साली पनवती नडली. आता मी बाहेर जाऊन काय फत्तर खाऊ? कुठं राहू ?'' (पृ. क्र. ११९).

यावरुन, पोटाचा प्रश्न टायगर पुढे उभा राहिल्याचे दिसते. तुरुंगात अन्न मिळते, रहायला जागा मिळते म्हणून हे लोक तुरुंगाची वाट धरतात. हे वास्तव अण्णाभाऊ टायगरसारख्या लोकांच्या माध्यमातून दाखवितात तरीही चंदनची जगण्याची धडपड पाहून तिची दया येते. तर दयाराम, गोपाळ, टायगर यांच्या पिसाट वर्तनाची चीडही येते.

'चंदन' या कादंबरीत डॉ. जयवंत भोसले, पांडुबाबा ही नितिमान पात्रेही आहेत. ज्यांच्या मदतीमुळे चंदनच्या आयुष्यातील संकटे थोडीफार दूर होऊ शकली. सुसह्य होऊ शकली. या कादंबरीत येणारे डॉ. जयवंत भोसले यांची व्यक्तिरेखा म्हणजे प्रत्यक्ष अण्णाभाऊच, त्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून बोलतात असे वाटते. याची अनेक उदाहरणे 'चंदन' कादंबरीत वाचायला मिळतात. डॉक्टरसारख्या ध्येयवादी तरुणाने या झोपडपट्टीच्या वस्तीत दवाखाना एवढ्याचसाठी टाकला होता की, त्यामुळे जनतेची सेवा घडावी, लोकांना रोगमुक्त करावं, पैसा मिळविण्यासाठी ते या वस्तीत आले नव्हते तर ते गरिबांना औषध देणे आणि त्यांची सुधारणा करणे याच ध्येयामुळे ते तेथे आले होते. डॉ.जयवंत भोसले यांची व्यक्तिरेखा गरिबांबाबत कळवळा असणारी, त्यांची सुधारणा हेच ध्येय असणारी आहे जी अण्णाभाऊंचेच प्रतिक वाटते.

पुढेही त्यांच्या उद्‌गारातून त्यांच्या या उच्च ध्येयाची ते प्रचिती देतात. सर्व लोक 'गरिबांचा डॉक्टर' म्हणून त्याचे नाव घेत होते तर, रोग निवारणाबरोबरच लोकांच्यात सुधारणाही घडवून आणण्याचा प्रयत्न डॉक्टर करीत होते. दयाराम जेव्हा लोकसुधारणेविषयी खरं खोटं डॉक्टरला विचारण्यासाठी येतो तेव्हाच्या बोलण्यातून अण्णाभाऊच डॉक्टरच्या मुखातून बोलल्यासारखे वाटते. डॉक्टरने उत्तर दिले, ''ते खरंही नाही, खोटंही नाही. या माणसांनी निरोगी नि सुखी व्हावं. त्यांनी सुखानं काम करावं आणि देशाचं वैभव वाढवावं, असं मला वाटतं.' (पृ. क्र. ७३).

या उद्‌गारावरुन गरीब जनतेच्या सुखी, निरोगी होण्याबरोबरच देशाचं वैभव वाढण्याविषयीही लेखक आशावादी आहेत हे यावरुन दिसते. माणसानं, माणसांशी, माणसासारखं वागणं ही

माणूसभक्तीही डॉक्टरांच्या माध्यमातून अण्णाभाऊ जिवंत करतात. त्याचबरोबर यातून अण्णाभाऊंनी स्वत:चा मार्क्सवादी दृष्टिकोनही दाखविला आहे. डॉक्टर दयारामवर शाब्दिक हल्ला चढविताना म्हणतात, ''जी माणसं कष्ट करुन जगतात, पोटासाठी डोंगर बेचिराख करतात, त्यांना मी तरी भुतं म्हणणार नाही. या करोडो गरिबांच्या बळावरच जग चालतं.'' (पृ. क्र.७३).

हा अण्णाभाऊंच्या साम्यवादातून आलेला जीवनविषयक दृष्टिकोन यातून डोकावतो. अण्णाभाऊ स्वत:च म्हणतात, ''ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे.''

ही कष्टकरी कामगारांविषयी कळकळ तळमळ अण्णाभाऊंच्या सर्वच साहित्यातून दिसून येते. कामगारांच्या सुरक्षिततेविषयीही डॉ. भोसले यांच्या माध्यमातून अण्णाभाऊ आपले विचार व्यक्त करतात. त्यांच्यामते, जिथं कारखाना उभा राहील तिथं कामगार अवतीर्ण होतोच त्याचप्रमाणे कामगार जिथं कष्ट करील तिथं त्याच्या सुखसोयीची सर्व साधनं निर्माण झालीच पाहिजेत, त्याचा अर्थ तिथं दवाखानाही असणं जरुरी आहे.

हेच डॉक्टर चंदन तुरुंगात गेली असताना तिला सोडविण्याचा प्रयत्न करतात व तिला तुरुंगातून सोडवितातही. असा हा गरिबांचा डॉक्टर त्यांच्या केवळ आरोग्यासाठी धडपडत नाही तर त्यांना सुखी करण्यासाठीही झटतो. त्यांच्याच बरोबर येणारे पांडुबाबा ही व्यक्तिरेखाही अशीच आई-वडिलांच्या मायेला पारखी झालेल्या चंदनला तो आपली मुलगी मानतो. चंदनही त्याला 'बाबा' म्हणते. म्हणूनच त्याचं वर्णन करताना ही 'नितिमान म्हातारा माणूस' असेच केले आहे. राजाला सांभाळण्याचं, चंदनच्या अडचणीत तिला मदत करण्याचं कर्तव्यही पांडूबाबा पार पाडतो. गोपाळच्या दंग्याला घाबरुन चंदन पांडुबाबांचीच झोपडी जवळ करते. तोही तिला आधार देतो. अशाप्रकारे, पिसाट वृत्तीच्या, माणुसकीशून्य अशा दयाराम, गोपाळ, टायगर यांबरोबर त्या वस्तीत डॉक्टर, पांडुबाबा यांसारखी माणुसकीला जागणारी, मानवभक्ती मनात असणारी ही माणसंही अण्णाभाऊ चित्रित करतात.

### ०३.४ इतर स्त्री व्यक्तिरेखा :

'चंदन' या कादंबरीत येणाऱ्या पुरुष व्यक्तिरेखांबरोबरच काही स्त्री व्यक्तिरेखाही अशा येतात की ज्या स्त्री वर्गाला प्रेरणादायी नसल्या तरी त्यांच्याही माध्यमातून अण्णाभाऊ स्त्री विश्वाच्या समस्या, त्यांचे असुरक्षितपण, पुरुषी वर्चस्वाला पूर्णपणे स्वाधीन झालेल्या या स्त्री व्यक्तिरेखा वाटतात. 'चंदन' बरोबर या कादंबरीत 'चंपा', 'चिंगी', 'पारु' व तिची म्हातारी अशा स्त्री व्यक्तिरेखा या कादंबरीत येतात.

'चंदन' सोडून इतर स्त्री पात्रे ही संपूर्णत: पुरुष जातीला शरण गेलेली व स्त्री असूनही स्त्रीलाच फसविणारी अशी समोर येतात. चंपा, मात्र स्वत:ला जे भोगावं लागलं ते चंदनला भोगावं लागू नये म्हणून तिला आधार देते. टायगरपासून वेगळा झाल्यानंतर चंपाचा पती रंग्याही तिच्याच बरोबर 'चंदन'ला आपली बहिण मानून तिचे रक्षण करण्याचा, शेवटी तुरुंगातून सोडविण्याचाही प्रयत्न करतो.

चिंगी, पारु, तिची म्हातारी या पुरुषाला पूर्णपणे स्वाधीन झालेल्या आहेत. चिंगी व तिचा नवरा दामोदरच्याच कंपनीत काम करीत असतात. मुलाच्या मृत्यूमध्ये दयारामच्या सांगण्यावरुन डॉक्टरला अडकविणारे हे दोघे चंपा आणि रंग्याच्या बाटलीच्या पुराव्यामुळे स्वत:च अडकतात.

पारु व तिची म्हातारी ही सुध्दा दयारामच्या सांगण्यावरुनच चंदनला कंपनीत कोंडतात व दयारामला मदत करतात. दयारामच्याच पैशावर त्यांच पोट चालत असतं. पण, दयाराम जेव्हा पैसापाणी बंद करतो तेव्हा त्या त्याच्या विरोधातही जातात.

चंपा मात्र शेवटपर्यंत चंदनला मदत करते. ती चंदनला सांगते, "चंदनाक्का, या जगात एकटी बाई अब्रुचं जिणं जगू शकत नाही...." (पृ. क्र. ८)

या जगात एकट्या बाईला नीट जगू दिलं जात नाही हेच वास्तव चंपा भोगली होती. म्हणूनच रंग्याला ती देव मानत होती. त्यानंच तिला कसबीण होण्यापासून वाचविलं होतं. स्त्रीच्या अब्रुची किंमतही चंपा चंदनला सांगते आणि स्त्रीचं सौंदर्य हेच तिचा शत्रू बनते हे ही पटवून देतात चंपा तिला म्हणते, "जी अब्रु रत्नाच्या मोलाची असते, तिच्यावरच दरोडा पडण्याची शक्यता असते." (पृ. क्र.४८)

या सर्वांवरुन हेच लक्षात येते की, स्त्रीची अब्रु काचेसारखी असते. ती जीवाच्या मोलाने जपावी लागते नाहीतर, तिच्या देहाचे लचके तोडण्यासाठी अनेक लांडगे तिच्यावर टपून असतात. चंदनही अशीच स्वत:चे शील, पावित्र्य राखण्यासाठी जिवाच्या आकांताने प्रयत्न करते पण, अब्रुवर कोणालाही घाला घालू देत नाही.

चंदनच्या आजूबाजूचे विश्‍व, दारु, पोलिस चौक्या, खून, मारामाऱ्या, गरीबी, पोटाची आग, तुरुंग हेच आहे. यातही चंदन आपले अस्तित्व पूर्णपणे टिकवून ठेवते. हा संघर्ष चांगल्या-वाईटाचा, सत्-असत् प्रवृत्तीचा, माणुसकी-माणुसकी शून्यतेचा वाटतो आणि तरीही जीवनाबद्दलची आशा अण्णाभाऊ टिकवून ठेवतात कारण त्यांचे जगण्यासाठी लढणाऱ्यांच्या वरच प्रेम होते आणि तसेच नायिका-नायक त्यांनी रेखाटले होते.

'चंदन' या कादंबरीतील सर्वच व्यक्तिरेखा पाहिल्या तर प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या गोष्टीसाठी लढा हा देतच असतो. मग ती चांगली असो वा वाईट. म्हणूनच 'चंदन' या कादंबरीच्या प्रस्तावनेत अण्णाभाऊ आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणतात की, "या सुंदर मुंबापुरीत जेवढा झगझगाट आहे, तेवढाच तिच्या उपनगरात झोपडपट्टयात अंध:कार भरलेला आहे नि त्यात लाखो लोक जगत आहेत. त्यातच माझी 'चंदन' ही जगत आहे. या कादंबरीत मी तिचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे." (पृ. क्र. ४).

अशा या सर्व बाजूंनी सर्वच गोष्टींचा अंध:कार असलेल्या जगात जगणारी माणसं अभावालाच आपलं जीवन मानणारी असली तरी जीवन जगण्याची जिद्द मात्र ते न सोडता जे हवं ते सहज मिळत नसेल तर धमकावून का होईना मिळविण्याची त्यांची वृत्ती दिसते. याही मनोवृत्तीवर लेखक या कादंबरीच्या माध्यमातून प्रकाश टाकतात. याच मनोवृत्तीशी चंदन निकराने लढा देते. वासनेने बरबटलेल्या लोकांशी शीलरक्षणासाठी ती दोन हात करते. म्हणूनच या कादंबरीतील इतर स्त्रीपात्रे जशी पुरुषी वर्चस्वाला त्यांच्या वासनांना बळी पडतात, विरोध न करता सर्वकाही स्वीकारतात तसे पुरुषांपुढे मान तुकवणे चंदनला अमान्य आहे. म्हणूनच चंदन ही एक लढाऊ कामगार स्त्री ठरते. जी सर्व कामगार स्त्री विश्वाला प्रेरक वाटावी. 'चंदन' म्हणजे सर्व कामगार स्त्रियांचे प्रातिनिधिक चित्र वाटते. तिच्या वाट्याला अनेक संकटे येतात. पण ती विधवा, निराधार असली तरी अंत:प्रेरणा व नैतिक मूल्य यांवर तिची अपार निष्ठा असल्यानेच शेवटी विजयी होते, म्हणूनच बाबुराव गुरव म्हणतात, "पुरुषांचा स्वाभिमान चिरडला का तो पुरुष झंझावाती वेगाने पुरुष म्हणून उभा राहतो. स्वाभिमान संपतो अथवा मोडून निघण्याची शक्यता निर्माण होते तिथे तो मरतो. स्त्रीचे शील चिरडले जाते तेथे जीवनच आटोपते. पण ते झगडा घेऊन ताठ उभे राहते. तेथे क्षणकाळाची पत्नी म्हणून नव्हे तर अनंत काळाची माता म्हणून ती धरित्रीचेच रुप धारण करते."[३]

## ०४. स्त्री व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये :

'चंदन' या कांदबरीतील स्त्री व्यक्तिरेखांचे दोन गट करता येतात. एक शीलरक्षणासाठी झगडा देणारी व त्यासाठी मदत करणाऱ्या स्त्रिया तर दुसरा गट स्त्री असूनही स्त्रीलाच फसविणाऱ्या व पुरुषांच्या वासनांचे बळी पडलेल्या स्त्रिया.

या व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये कोणती ? याच्या उत्तरासाठी हे दोन गट निश्चितच मार्गदर्शक ठरतील असे मला वाटते. कामगार जगतात राहून बुभुक्षित पुरुषांबरोबर लढणारी चंदन तिचे हे लढाऊपण हेच तिचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. स्त्री व्यक्तिरेखेतील केवळ चंदनच नव्हे तर सर्वच

स्त्री व्यक्तिरेखा या स्त्रिया तरुण आहेत, सुंदर आहेत आणि दुर्दैवीही आहेत. अण्णाभाऊंच्या या कादंबरीतील स्त्री ही भारतीय समाजजीवनातील कामगार झोपडपट्टीवासीय अशा कष्टकरी वर्गातील उपेक्षित, दुर्लक्षित अशी स्त्री आहे.

आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, या कादंबरीतील स्त्री स्त्री-पुरुष संबधाला नैतिकतेचा, शील रक्षणाचा, मानवतेचा आणि शोषण व त्याविरुध्द लढणाऱ्या संघर्षाचा भक्कम पाया देते. त्यासाठी प्रसंगी ती जेलही भोगते.

या स्त्रिया रणरागिणी आहेत, जीवनदायिनी जशाआहेत तशा वेळप्रसंगी जीव घेणाऱ्यासुद्धा आहेत. त्या गरिबीतल्या आहेत, त्यांच्यात माणुसकी आहे पण परिस्थितीने त्यांच्यातील माणुसकीवर काही वेळा मातही केली आहे. त्या निर्भयतेने बुऱ्याचा, वाईटाचा तिरस्कारही करणाऱ्या आहेत. ही स्त्री अस्मितेसाठी जबरदस्त संघर्ष करते. ती एक साधी, सामान्य वर्गात आढळून येईल अशी स्त्री आहे. म्हणूनच ती अखिल स्त्री विश्वाचे प्रतिनिधित्व करु शकते. अण्णाभाऊही तिचे वर्णन तेवढ्याच उदात्त भावनेने करतात. कुठेही तिच्या पावित्र्याला धक्का लागू देत नाहीत वा तशी वर्णनेही करीत नाहीत. केवळ स्त्री असल्यामुळेच पुरुष कामगारांच्या तुलनेत कितीतरी अधिक मोठी दु:खे तिला सहन करावी लागतात. तरीही ती विद्रोही न बनता शांतपणे जेवढा विरोध करता येईल तेवढा करते. पण, वाचकांचे मन हेलावून टाकते. या स्त्रियांमध्ये लढून का होईना जगण्याची उमेद दिसते. स्त्री स्वभाववैशिष्ट्यांवर भाष्य करताना चंपा चंदनला म्हणते, ''जी बाई पुरुष पुढ्यात आला की, पापण्या पाडते, ती दुबळी समजली जाते. ती लवकर काबूत येऊ शकते.'' (पृ. क्र. १४).

यावरुन स्त्रीने नेहमी ताठ मानेने कुणालाही न घाबरता जगायला शिकले पाहिजे नाही तर, तिच्या आजूबाजूची परिस्थिती तिला जगू देणार नाही. म्हणूनच या कादंबरीतील स्त्रिया जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जात आहे असे दिसताच त्या लढा देण्यास तयार होतात. म्हणूनच दयारामच्या अंगावर ॲसिड फेकण्याचे धाडस चंदन करते. अण्णाभाऊंची चंदन किंवा इतर स्त्रिया विद्रोहाने पेटून जरी उठत नसल्या तरी त्यांच्यापरीने त्या अन्यायाला विरोध करण्याचा प्रयत्न निश्चितच करतात.

## ०५) स्त्री कामगारांच्या प्रश्नांकडे आकृष्ट करणारी कादंबरी :

मुळातच 'चंदन' ही कादंबरी एक वेगळे जीवनविश्व घेऊन अण्णाभाऊ साकार करतात. मुंबईचा झगझगाट एकीकडे आणि तिच्या उपनगरीय झोपडपट्ट्यातील अखंड अंध:कार एकीकडे असा विरोधी टोकांचा अण्णांनी घेतलेला अनुभव, त्यातून भावलेली जीवनस्थिती, लाखो कामगार जगताचे जगणे चरफडणे अण्णाभाऊ चंदनच्या माध्यमातून जिवंतपणे मांडतात.

झोपडपट्ट्यांमध्ये राहणारा, रेल्वेच्या पुलांखाली, फलांटांशेजारी संसार मांडणारा, खेड्यात पोट भरत नाही म्हणून मुंबईकडे आशेने वळलेल्या गरीब माणसाला मुंबई अखेर झोपडपट्टीतच ठेवते. त्यामुळे झोपडपट्टीय, असुरक्षित कामगार वर्गाची व्यथा, दु:खे, त्यांच्यावर अचानक ओढविणारी संकटे या सर्वांचा परिचय कादंबरीच्या माध्यमातून अण्णांनी करुन दिला आहे.

या कादंबरीची नायिका 'चंदन' तिचा पती आणि मुलाबरोबर कुणीतरी मुंबईबाबत सांगितलेली दंतकथा ऐकून मुंबईत येते. मुंबईत आल्यावरही त्यांची फरपट थांबत नाही. कामाच्या शोधार्थ पायी मुंबई पालथी घातली जाते. पण, काम काही लवकर मिळत नाही. नंतर हे कुटुंब घाटकोपरला येते. तेथे डोंगर फोडण्याचे काम चालू असते. त्या कामावर कामावर जगू रुजू होतो. तिथेच पांडूबाबामुळे राहण्याचा प्रश्न सुटतो. त्यांच्या शेजारच्या झोपडीत राहण्याची व्यवस्था तो नितिमान म्हातारा करतो. अशाप्रकारे दिवसभर डोंगर फोडण्याचे काम आणि रात्री दिवे लावण्याचे काम दोन रुपये रोजाने मिळते. रात्रंदिवस कष्ट चालू होतात. दिवसही हळुहळू पालटू लागतात. चंदनलाही घर सुख-समृद्धीने भरल्याने भोगलेल्या दु:खाचा विसर पडतो. पण, एके दिवशी अचानक संकटांचा डोंगर चंदनवर व तिच्या संसारावर कोसळतो. मोठा गडगडाट होतो. वस्ती हादरते. गरीब बिचारी माणसे कावरीबावरी होतात आणि कशाचा आवाज म्हणून पाहू लागतात. तोच 'खाणीत कडा कोसळला असे कोणीतरी ओरडते. ते ऐकून चंदनचे अवसानच गळते. पाचशे फूट उंचीचा कडा कोसळून एकूण एक कामगार त्याखाली गाडले. मरणारांची पोरेबाळे त्या ढिगाऱ्याभोवती टाहो फोडून रडत होती. काही स्त्रिया मातीचे बकाणे भरत होत्या. केवळ बाराच प्रेते बाहेर काढली गेली आणि गाडले गेलेले कामगार बेपत्ता झाले असे कंत्राटदारांनी नंतर जाहीर केले. नुकसान भरपाई द्यावी लागू नये म्हणून त्यांनी तो कांगावा केला होता.

असे हे कामगारांचे जीवन सतत असुरक्षिततेच्या भोवऱ्यात अडकलेले असते. कंत्राटदारांची मक्तेदारी असलेल्या सर्वच ठिकाणी कामगारांना अशाच प्रकारे जीवाचे मोल द्यावे लागते. कामगारांच्या मृत्यूची जबाबदारी कुणीही न घेतल्याने नुकसान भरपाई देऊन कामगारांच्या कुटुंबियांना आधार देण्याचा प्रयत्नही कोणी करीत नाही. त्यामुळेच चंदनवर संकट कोसळते. ती निराधार बनते व पुन्हा तिलाही कामगार म्हणूनच कष्ट करावे लागतात. एकटी, तरुण, सुंदर, विधवा स्त्री आणि त्यात कामगार त्यामुळे लोकांचे कुत्सित बोलणे, डोळ्यांच्या खुणा हे सर्वच तिला पहिल्याच दिवशी नकोसे वाटते. तिच्या निराधारपणाचा फायदा उठवून ही तरुण, विधवा, सुंदर स्त्री आपली कशी होईल याचाच विचार प्रत्येकजण करीत होता. म्हणूनच दयारामही तिला जगूच्या मृत्यूची बातमी

सांगून तिला आपली करण्याचा प्रयत्न करतो, राणी बनविण्याचे स्वप्न दाखवितो. पण 'चंदन' विधवा असली तरी लाचार नव्हती आणि म्हणूनच ती कणखरपणे उत्तर देते, "मी गरीब आहे आणि गरीब राहीन." (पृ. क्र. १९).

अशाप्रकारे गरिबीतही आपला स्वाभिमान, शील, पावित्र्य जपण्याचा प्रयत्न चंदन करते. अशी पुरुषांची जबरदस्ती, धमकावणे ही केवळ एका चंदनची समस्या नसून तसा थोडाफार का होईना अनुभव स्त्री कामगार स्त्रियांना येतोच; म्हणून ही सर्व स्त्री कामगारांची व्यथा आहे.

व्यसनी, दारुडे, थोड्या-थोड्या गोष्टींवरुन खून, मारामाऱ्या करणारे नवरे, सतत नशेत असणारे. यामुळे स्त्रियांच्या समस्येत भरच पडत होती. यामध्ये एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीची शत्रू बनते. म्हणूनच चंपाला वाढविलेल्या एक बाईनं तिला एका माणसाच्या हवाली केलं. त्या माणसाबरोबर संसार करावा असं चंपालाही वाटत होतं. पण, त्याच माणसानं चंपाला मुंबईत आणून तिचा गळा कापला. त्यानं चंपाला बाजारात बसवलं, बाजारबसवी कसबीण बनवलं.

अशी ही एकट्या स्त्रीची होणारी अवस्था. एकूणच समस्येच्या गर्तेत सहजपणे अडकलेली स्त्री विचारात घेता आण्णाभाऊंनी आंतरिक जिव्हाळ्याने स्त्रियांचे प्रश्न, त्यांचे दु:ख अगदी ठाशीवपणे मांडले आहे आणि या प्रश्नांच्या माध्यमातून सर्व समाजाला विचारप्रवृत्त करण्याचाही प्रयत्न केलेला आहे. कामगार म्हणून भोगावे लागणारे जीवन अण्णाभाऊंनी स्वत: अनुभवले होते. तेथेच त्यांनी स्त्री कामगारांची दु:खेही, त्यांचे कामगार स्त्री म्हणून असलेले प्रश्न जवळून पाहिले होते. म्हणूनच स्त्रीवर्गाबद्दल त्यांच्या अंत:करणात अपार कणव दिसते.

या कादंबरीतील स्त्री ही कामगार तर आहेच, त्याचबरोबर ती शोषित आहे. म्हणूनच कामगारांवर अन्याय करणारा मालक वर्ग (कंत्राटदार, ठेकेदार) शोषकाच्या रुपातून समोर येतात. यातील दयाराम याच वृत्तीने सर्वांवर आपली जरब बसवत असतो आणि सर्व मान तुकवून त्याचा आदेश ऐकतात. ज्या कामगारांच्या जीवावर कंत्राटदार मोठे होतात. त्याच खाणीमध्ये कामगारांचे जीवन असुरक्षिततेने भरलेले आहे. यातून गरिब-श्रीमंत, मालक-नोकर, शोषक-शोषित ही दरी 'चंदन' मधील कामगारांच्या माध्यमातून रेखाटतात.

### ०६. विधवा स्त्रियांच्या दु:खाची संघर्ष कथा :

विधवा, निराधार, तरुण, सुंदर स्त्रीकडे समाज कोणत्या दृष्टिने पाहतो. विकारवश मने कोणत्या प्रकारे पाहतात याचे प्रतिनिधिक दर्शन अण्णाभाऊंनी 'चंदन' च्या माध्यमातून घडविले आहे. परिस्थितीने घाला घातलेली चंदन विधवा असली तरी परिस्थितीपुढे दुबळी न बनता कणखर बनते.

चंदनचा हा कणखरपणा तिला सर्व प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्यास उपयुक्त ठरतो. अण्णाभाऊंही चंदनच्या या जीवनानुभवाला सहानुभूतीची जोड देतात. पण दाहक वास्तवतेला दडवत नाहीत आणि त्यातूनच विधवा स्त्रियांच्या दु:खाची प्रातिनिधिक संघर्षगाथा आविष्कृत होते. स्त्रीचे दु:ख अण्णांच्या हृदयात घर करते कारण, ज्या समाजात, ज्या वातावरणात अण्णाभाऊ जन्मले, जगले, वाढले, त्या ग्रामीण तसेच शहरी समाजजीवनातही स्त्री ही त्यांना अनंत अत्याचाराला बळी पडल्याशिवाय दिसली नाही. ही स्त्रीची वेदना अण्णांच्या संवेदनशील मनाला सहन न झाल्यानेच त्याच स्त्रीची आर्त वेदना ते सतत मांडीत राहिले.

चंपा चंदनला सतत तिने भोगलेल्या वास्तवाची जाणीव करुन देत असते आणि तिला आधारही देत असते. ती चंदनला म्हणते की, कसबीण होणाची कुणाला हौस नसते तर जबरी करुन तिला त्या नरकात बुडवतात. बाईचा जन्मच वाईट. एखादी स्त्री स्वत:ला आवरु शकते. पण तिच्याकडे रोखणाऱ्या नजरांना ती अडवू शकत नाही.

थोडक्यात, असेच म्हणता येईल की, हा समाज एकट्या स्त्रीला व्यवस्थित जीवन जगूच देत नाही तर तिनं नेहमी कोणाच्या तरी सावली खालीच रहावं हाच या पुरुषी मक्तेदारीचा रिवाज हेच या कादंबरीतील पुरुष व्यक्तिरेखा बिंबवतात. यामुळेच विधवा चंदनला सुद्धा या सगळ्यातून मार्ग काढण्यासाठी स्वत:च झटावे लागते. या तिच्या संघर्षामध्येही अण्णाभाऊं तिलाच साथ देतात. तिला कोणताही दोष न देता तिचे आशावादी सकारात्मक जीवनच चितारतात. तरीही तुरुंगातून सुटल्यानंतर समाजाची भीषण वास्तवता उभी करताना चंदनची अवस्था पुन्हा दोलायमान बनते. ''कोणी आधार देणार नाही, जिथे जावे तिथे तेच वाढून ठेवलेले असणार. जो कोणी निवारा देईल, तोच प्रथम आपली अब्रू जाळील.'' (पृष्ठ ६८)

अशी 'चंदन'ची एका विधवा, एकट्या स्त्रीची अगतिकता अण्णाभाऊ मांडतात. एका स्त्री देहासाठी मरायला आणि मारायलाही तयार असलेल्या क्रूरकर्म्यांच्या समोरच ती चंदन आपल्या राजासाठी जगत असते, पण गोपाळ, टायगर, दयाराम यांच्या जबरीमुळे ती कसबीण म्हणून, रखेल म्हणून जगण्यापेक्षा मरण बरं म्हणून मरणाला ती जवळ करण्याचाही निश्चय करते. पण, पुन्हा राजाला पाहून तिचे पाऊल अडखळते व एका स्त्रीवर, एक आई कुरघोडी करते. हे विधवा स्त्रियांचे दु:ख अण्णाभाऊ अतिशय आत्मीयतेने, तळमळीने मांडतात.

## ०७. झोपडपट्टीच्या जीवनाचे वास्तववादी दर्शन :

'चंदन' ही एका विधवेची व्यथात्मिकता आहे. त्याच प्रभावीपणे ती झोपडपट्टीचे वास्तववादी दर्शन घडविणारीही आहे. मुंबईतील झोपडपट्टीतील जीवनाच्या भयावहतेचे भयंकर चित्र या कादंबरीत रेखाटले आहे.

''डोंगराच्या पायथ्यापासून नारायणनगर पर्यंत झोपडीला झोपडी खेटली होती. खाणीत काम करणाऱ्यांप्रमाणेच भिकारीसुद्धात्या झोपडपट्टीत राहत होते. ते सर्व लोक त्या अंधारात वावरत होते.'' (पृ. क्र. २१).

यातूनच झोपडपट्टीतील अंधारमय जीवनावर अण्णाभाऊ प्रकाश टाकतात. नगरपालिकेचे दिवेसुद्धा तिथल्या भयाण अंधाराला दूर करु शकत नव्हते. माणसं, जनावरं त्यांचं सर्व काही त्याच ठिकाणी उरकलं जात होतं.

झोपडपट्टीतील दारिद्रयावर भाष्य करताना अण्णाभाऊ नळांवर, संडासांवर रांगा, प्रत्येक माणसाची आवाज चढवून बोलण्याची वृत्ती, तिथेही दुबळ्या माणसांवर हुकूम गाजविण्याचा स्वभाव या सर्व वृत्ती प्रवृत्तीचे चित्रात्मक रेखाटन करतात. यातून झोपडपट्ट्यांमधील दयनीय स्थिती अण्णाभाऊ उभी करतात. माणसांचे जगणे आणि चरफडणे अशी झोपडपट्टीतील जीवनाची अवस्था लेखकाने 'चंदन' मधून उभी केली आहे. म्हणूनच उपेक्षित, दुर्लक्षित जगाला साहित्य विषय बनविण्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून चंदनकडे पाहता येते.

झोपडपट्टी वस्ती रात्री दिवसभर पोटाच्या मागे गेलेल्या माणसांनी गजबजलेली असते. दारुसाठी झालेली गर्दी चिंगीच्या हातभट्टीच्या दारुने सर्व वातवरण घाणीने भरलेले होते. नारायणनगरात डिसोझाच्या घरात मेरी आणि तिच्या आईने दारुचा धंदाच सुरु केला होता. दारुची आंबट घाण, तळलेल्या माशांचा दरवळ याने ते घर कोंदटले होते. तिथेच काही जण कोंबड्याप्रमाणे झिंगत होते. तर काही पेंगाळून पडले होते. बाटलीवर बाटली सर्वचजण रिचवीत होते. सगळी टवाळी पुन्हा तिथं एकत्र जमले होते. त्यातच, टायगर तिरफडत रस्त्यावर आडवा झाला आणि हाताला लागलेल्या शेळीच्या लेंड्या शेंगदाणे म्हणून नशेतच त्याचा बकणा भरला. अशी ही दारुच्या नशेत पूर्ण बेबंद झालेली माणसं, त्या वस्तीला अधिकच वाईट कळा आणत होती.

हीच झोपडपट्टी पावसाळ्याच्या दिवसात हादरुन जाते. काम बंद तर त्यांची चूल बंद. अन्नाबरोबरच निवारा यांचाही अभाव. जुन्या पत्र्यांची, फळ्यांची आणि पोत्यांची त्यांची झोपडी

पावसाच्या पहिल्याच तडाख्यात भुईसपाट होते. या परिस्थितीत कसे जगावे ही भयंकर विवंचना झोपडपट्टीवासीयांना लागलेली असते. तरीही 'पावसानं का अंगाला कोंब येत्यात?' असे म्हणून एकमेकांनाच धीरही देत होती. अशी ही गरिबी पोटानं आणि निवाऱ्यानं चिंतातूर करणारी होती.

शिक्षण, आरोग्य, सुख-सोयी यांचा तर कुठही मागमूसही नसलेल्या या झोपडपट्ट्यातील जगणं म्हणजे तारेवरची कसरतच. इथं राहणारी माणसं ही संस्काराचा, नितीचा, सत्चा अभाव असणारीच. सतत आपली वासनेची भूक कोणत्या तरी स्त्री देहाने भागविण्याची त्यांची रीत. जर कुणी स्त्री जर त्यांना बुजली नाही तर मात्र ती जबरीनं मिळविण्याचा ही माणूसरुपी जनावरं प्रयत्न करतात. त्यासाठी स्वत:ही जळतात व दुसऱ्यालाही जाळण्याचा विचार ते करतात.

यातून वास्तवाला अण्णाभाऊंच्या साहित्यात अनन्यसाधारण स्थान असल्याचे दिसते. हेच त्यांच्या साहित्याचे उद्‌दिष्ट आहे. यामुळे अण्णांचे साहित्य थेट मनाशी संवाद साधते. मनाला भिडते, कारण त्यांनी कल्पनेच्या भराऱ्या मारणं कधी मान्य केल नाही. म्हणूनच ते म्हणतात की ज्यांना अन्न नाही म्हणून उपाशीच रहावे लागते. त्यांना वेगळा उपवास करण्याची गरजच नसते. ही वास्तव जीवनाची झोपडपट्टीवासीयांची खरी व्यथा आहे. ही पोटाची आग अण्णाभाऊंनीही अनुभवली आहे. त्यामुळे त्यांच्या अनुभूतीला ते सहानुभूतीची जोड देऊ शकतात. त्यांच्या व्यक्तिरेखा त्यांनी पाहिलेल्या आहेत. म्हणूनच 'चंदन' ते साकारु शकले. खेड्यातील लोकांची कामासाठी शहराकडे असणारी ओढ व तिथे गेल्यावर मात्र होणारी भयंकर निराशा याचे वास्तव दर्शन 'चंदन' या कादंबरीत अण्णाभाऊ घडवितात. यातून ते केवळ पोटासाठीचा, जगण्यासाठीचा संघर्ष चितारत नाहीत तर, मानवरुपी भूतांशी शीलरक्षणासाठी अखंड चाललेला संघर्षही जिवंतपणे रेखाटतात.

कादंबरीच्या कथानकातून अण्णाभाऊ 'चंदन' हे कादंबरीला दिलेले शीर्षकही यथार्थ ठरवितात. ही कादंबरी म्हणजे चंदनच्या व्यक्तिमनाला तिच्या संघर्षाला अनुलक्षूनच असल्याचे तिचे शीर्षकच सांगते. आणखी एक म्हणजे, माझ्यामते चंदनाचा वृक्ष ज्याप्रमाणे आपल्या सुवासाने आपल्या सभोवतीचे वातावरण सुगंधित करतो. त्याच्या सुवासाने जहरी सापही त्याच्याकडे आकर्षित होतात. तशीच लेखकाची नायिका 'चंदन' जिच्या रुपसौंदर्याची कमान चढती आहे. जिच्या तारुण्याचा समुद्र उसळलेला आहे अशी चंदन झोपडपट्टीतील सर्वांनाच आपल्या सौंदर्याने, स्वभावगुणाने आकर्षित करते. पण, त्यातूनच तिच्या जीवनात सापमुंगुसाची लढाई सुरु होते आणि त्या पिसाट मानवी वृत्तीशी दोन हात करताना तिला तुरुंगातही जावे लागते. पण तिथेही मानवी सर्पांनी तिची पाठ सोडलेली नसते. ही सर्व अगतिकता, कादंबरीचे शीर्षक झोपडपट्टीय पार्श्वभूमीला अनुकूलच ठरते. यातून तिथल्या जीवनाच्या सर्वच अंगावर अण्णाभाऊ प्रथमच प्रकाश टाकतात.

शेवटी मनोगतातून उद्‌धृत केलेली भूमिका 'चंदन' च्या विविधांगी अनुभवातून पूर्णत्वास नेतात आणि एक उपेक्षित, दीन स्त्री चंदनचे चित्रण समर्थपणे उभे करतात.

## ०८. समारोप :

अशाप्रकारे, 'चंदन' ही कादंबरी स्त्री कामगारांच्या प्रश्नाला वाचा फोडणारी, विधवा, निराधार स्त्रीची व्यथात्मिका आहे. दयाराम, गोपाळ, टायगर, चंपा, रंग्या, डॉ. जयवंत, आणि नायिका चंदन अशा सर्व व्यक्तिरेखा या कादंबरीत येतात. यातील डॉ. जयवंत भोसले यांची व्यक्तिरेखा बाजूला ठेवली तर, इतर सर्व पुरुषपात्रे ही स्त्रैण प्रवृत्तीची, विकारवश मनाने ग्रासलेली, संस्कारहीन, नीतीहिन अशीच आहेत. परंतु, या सर्व मानवी सर्पांशी बाणेदारपणे आणि धाडसाने सामना करणारी 'चंदन' ही स्त्रीत्वाचा आविष्कार ठरते. अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यातील सर्वच नायिका लढवय्या आहेत. त्या कोणताही अन्याय मूकपणे सहन करीत नाहीत. त्याविरुद्ध पेटून उठतात. त्याला 'चंदन' सुद्धा अपवाद ठरत नाही.

प्रस्तुत कादंबरीत चितारलेले मुंबईतील झोपडपट्टीवासीयांचे दैन्यावस्थेतील जीवन, त्यांना पदोपदी नडणारे दारिद्र्य, वासनांनी भरलेली मने, कंत्राटदारांची कामगारांविषयी दुर्लक्षिततेची भावना व त्यातून होणारी जीवितहानी अशा सर्व वास्तवप्रश्नांना मार्क्सवादी विचारांच्या प्रभावातून अण्णाभाऊंनी हाताळले आहे.

मुंबईतील विधवा, निराधार आणि सुंदर तरुण, कामगार यांचे असुरक्षित जीवन, त्यांच्यावर पडणारी पुरुषी गिधाडांची धाड त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनात निर्माण झालेली लढाई आणि तरीही त्या सर्व संकटांशी संघर्ष करून धाडसाने त्याला तोंड देण्याची वृत्ती या सर्वांचा प्रत्यय अण्णाभाऊंच्या 'चंदन' या कादंबरीतून येतो. अण्णांनी स्वत:च्याच जीवनात शोषण, दु:ख अनुभवले होते. तेच त्यांनी पूर्ण नष्ट करण्याचा प्रयत्न केला. दारिद्र्याने पीडलेल्या मुंबईच्या गलिच्छ वस्त्यांमधून राहणाऱ्या व्यक्तींचे अत्यंत बोलके आणि जिवंत चित्र अण्णाभाऊंनी रेखाटले.

## ०९. निष्कर्ष :

१) अण्णाभाऊंची स्त्री समस्यांना चित्रित करणारी चंदन ही कादंबरी उपेक्षित जग, सामान्य स्त्रीची व्यथा यांना केंद्रिभूत मानून लिहिली गेली आहे.

२) 'चंदन' कादंबरीतील 'चंदन' ही विधवा स्त्री कामगार झोडपट्टीवासीय सामाजिक पार्श्वभूमीतून निर्माण होणाऱ्या समस्यांना सामोरी जाते व एका सुरक्षित भविष्याची आशा या समाजाकडून करते.

३) 'चंदन'च्या माध्यमातून अण्णाभाऊंनी स्त्रीत्वाचा, तिच्या पावित्र्याचा, शीलरक्षणासाठीचा अखंड संघर्ष उभा केला आहे.

४) अण्णाभाऊंची अंधारात जगणाऱ्या, चरफडणाऱ्या जगाविषयी अतीव कणव या कादंबरीतून दिसून येते.

५) अण्णाभाऊंची चंदन कुठेही अन्यायाविरुद्ध विद्रोही बनत नाही तर, स्वत:च्या पातळीवर त्याविरुद्ध लढा देण्याचा प्रयत्न करते.

६) स्त्रियांचे वेगळे विश्व अण्णाभाऊंनी, तरुण, सुंदर, विधवा, निराधार अशा स्त्रियांच्या माध्यमातून उभे केले आहे.

७) सत्-असत्, नीती-अनिती, शोषक-शोषित असा संघर्ष अण्णाभाऊ मार्क्सवादी विचारांच्या प्रभावाखाली मांडतात.

## १०. संदर्भ :


१) गुरव डॉ. बाबुराव : 'अण्णाभाऊ साठे : समाजविचार व साहित्यविवेचन', लोकवाङ्मयगृह मुंबई - २५, आवृत्ती २ री १९९९, पृ. क्र. ४१.

२) साठे अण्णा भाऊ : 'चंदन', चंद्रकांत शेटे प्रकाशन, ४ थी आवृत्ती, १९७६, पृ. क्र. ३३.

३) गुरव डॉ. बाबुराव : 'अण्णाभाऊ साठे : समाजविचार व साहित्यविवेचन', उनि. पृ. क्र. ५७.


-----x-----